**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मा.पीठासीन अधिकारी/मा.उप पीठासीन अधिकारी व दोन्ही सभागृहाचे मा.विरोधी पक्षनेता यांचे कार्यालयात माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी पदनिर्देशित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई - ४०० ०३२

क्रमांक : १०८०४/ क-१,

दिनांक : ११ जुलै, २०२५

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तक्रार-२६१५/१४५०/प्र.क्र./२९९/२१, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६

**:: आदेश ::**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज तथा अपिल अर्जांवर उचित कार्यवाही करण्यासाठी सदर अधिनियमाच्या कलम ५ (१) व १९ (१) व संदर्भाधीन शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तसेच मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा त्याचप्रमाणे मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालयात **'माहिती अधिकारी'** व **'अपिलीय प्राधिकारी'** पदे निर्देशित करण्यात येत आहेत.

उपरोक्तप्रमाणे निर्देशित केलेल्या पदांवर मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तसेच मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा त्याचप्रमाणे मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालयामार्फत **"माहिती अधिकारी"** व **"अपिलीय प्राधिकारी"** पदावर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यात यावी.

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी पदावर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**( मेघना तळेकर )**
सचिव (२),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२/..

**प्रत माहितीसाठी :-**

१) सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्य

२) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

४) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

५) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

६) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी, विधान भवन, मुंबई

७) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी, विधान भवन, मुंबई

८) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी, विधान भवन, मुंबई

९) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी, विधान भवन, मुंबई

१०) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

११) मुख्य सचिवांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई

१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

१३) सर्व मंत्रालयीन विभाग

१४) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष

१५) संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय